# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर  **P.S.(ठाणे):** पाथर्डी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0661  **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**17/06/2025 21:15

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 3 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 238 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Time Period (कालावधी):** पहर 4
   **Date From (दिनांक पासून):** 17/06/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/06/2025
   **Time From (वेळेपासून):** 12:30 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 12:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 17/06/2025  **Time (वेळ):** 13:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 031

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/06/2025 21:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पाथर्डी ,पाथर्डी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सुनिल अशोक कोलते

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1997

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | माळी बाभुळगाव,पाथर्डी,पाथर्डी,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | माळी बाभुळगाव,पाथर्डी,पाथर्डी,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8329532727

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लक्ष्मण सुकदेव पोटे | | | 1. पाथर्डी पोलीस स्टेशन,पाथर्डी , पाथर्डी,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | रामदास जयराम सोनवणे | | | 1. पाथर्डी पोलीस स्टेशन,पाथर्डी , पाथर्डी,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |
| 3 | राहुल शिवाजी साबळे | | | 1. शिक्षक कलनी माळीबाभुळगाव, पाथर्डी ,पाथर्डी,अहिल्यानगर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद पाथर्डी पोलीस ठाणे जि. अहिल्यानगर
दिनांक 17/06/2025

माझे नाव सुनिल अशोक कोलते, वय 28 वर्षे, व्यवसाय षेती व हॉटेल, रा. माळी बाभुळगाव, ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर मोनं. 8329532727
समक्ष हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहत असुन मी षेती व्यवसाय करतो. तसेच मी पाथर्डी-तिसगाव रोडवर हॉटेल शिवनेरी मिसळ हे चालवित असुन सदर ठिकाणी मी चहा नाश्टा, व जेवणाची सोय केलेली आहे.
सुमारे 5 ते 6 दिवसांपुर्वी मी माझा मित्र षाहरूख याचे चिकन दुकानावर गप्पा मारत बसलेलो होतो. आम्ही गप्पा मारीत असतांना सदर ठिकाणी आलेला लक्ष्मण पोटे पोलीस यांनी मला सांगितले की, ''तुझी शिवनेरी मिसळ हॉटेल रात्री उशिरापर्यंत चालते, हॉटेलवर गर्दी गोंधळ होतो हॉटेल उशिरापावेतो चालवितो तुझ्या हॉटेल वर कारवाई करावी लागेल'' असे म्हणु लागले. त्यावेळी मित्र षाहरूख व मी त्यांना समजावुन सांगितले की, हॉटेल रात्री 10 वाजेपर्यंत बंद करीत असतो असे सांगितले. त्यावेळी त्यांनी माझे काहीएक ऐकुन न घेता ''तुझ्यावर कारवाई करावी लागेल असे म्हणाले. सदर वेळी मी घाबरून गेलो असता मित्र षाहरूख याने पोटे पोलीस यांना नंतर पोलीस स्टेशनला येतो असे सांगितले. त्यावेळी पोटे पोलीस यांनी '' तुझ्या हॉटेलवर कारवाई करावयाची नसेल तर मला महीन्याला 2,000/- रू हप्ता दयावा लागेल, हप्ता घेवुन रविवारी पोलीस स्टेशनला या'' असे सांगितले होते. मला पोटे पोलीस यांना लाच किंवा हप्ता दयावयाची ईच्छा नसल्याने मी मित्र सागर निकम यांचे फोनवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नासिक येथे संपर्क करून तक्रार असल्याचे कळविले होते.
मी तक्रार असल्याचे कळविले वरून पोलीस उप अधीक्षक श्री बडगुजर व सापळा पथक असे पंचासह दिनांक 15/06/2025 रोजी तिसगाव येथे आले. त्यानंतर मी माझे स्वहस्ताक्षरात पंचासमक्ष माझी तक्रार लिहुन दिली. माझे तक्रारीचे अनुशंगाने लोकसेवक श्री पोटे पोलीस हे माझे हॉटेलवर कारवाई न करण्याचे मोबदल्यात माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करणे कामी दिनांक 15/06/2025 रोजी मला, माझा मित्र षाहरूख व षासकीय पंच श्री. हर्शल देसले अशांना श्री बडगुजर सो यांनी पडताळणी कारवाईकामी आवश्यक सुचना देवुन माझेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन आम्हाला पोटे पोलीस यांचे भेटीसाठी पाथर्डी पोलिस स्टेशन येथे रवाना केले. त्याप्रमाणे मी, मित्र षाहरूख व पंच हर्शल देसले अशांनी पोटे पोलीस यांची पाथर्डी पोलीस स्टेशन येथे भेट घेतली असता त्यांनी पंचासमक्ष माझे हॉटेल वर कारवाई न करण्यासाठी माझेकडे लाच म्हणुन दर महीन्याला दिड हजार रू हप्ता मागणी करून ते स्विकारण्याचे मान्य केले. सदर बाबत सविस्तर पडताळणी पंचनामा पंचासमक्ष करण्यात आला.
त्यानंतर आज दिनांक 17/06/2025 रोजी श्री बडगुजर साहेब व सापळा पथक तसेच पंच असे पाथर्डी येथे आले. त्यावेळी सापळा पथकातील पोकॉ/ठाकरे यांनी बडगुजर साहेबांच्या सुचनांप्रमाणे मी हजर केलेल्या लाचेच्या रकमेतील नोटांचे नंबर्स एका कागदावर लिहून नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावून, सर्वांना त्याच्या गुणधर्माची

माहीती देउन व त्याचे प्रात्यक्षिक दाखवून मला व पंच हर्शल देसले यांना आवश्यक त्या सुचना देउन माझेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन पोटे पोलीस यांना भेटण्यासाठी पाठविले. त्यावेळी आमचेसोबत मित्र षाहरूख देखील होता. त्याप्रमाणे मी व पंच हर्शल देसले असे पाथर्डी पोलीस स्टेशन येथे गेलो असता मित्र षाहरूख याने पोटे दादा यांचेशी संपर्क केला असता त्यांनी ते उप जिल्हा रूग्णालय पाथर्डी येथे आरोपीच्या मेडीकलसाठी आले असल्याचे सांगून आम्हाला त्यांनी तेथे बोलावले वरून आम्ही उप जिल्हा रूग्णालय पाथर्डी येथे जावुन पोटे पोलीस यांची भेट घेतली असता पोटे पोलीस यांनी त्यांचे ताब्यातील आरोपी राहुल साबळे याचे समक्ष माझेशी चर्चा करून 1,500/- रू हप्ता म्हणुन लाच मागणी करून ते त्यांनी उप जिल्हा रूग्णालय पाथर्डी येथे त्यांचेसोबत मेडीकलसाठी आणलेल्या पोस्को गुन्हयातील आरोपी राहुल साबळे यांच्याकडे देण्यास सांगितले व राहुल साबळे यांनी सदर रकम लाचेची रकम असल्याचे माहीत असतांना रकम स्वीकारण्याचे न नकारता, 'घेतो घेतो' असे म्हणुन लाचेची रक्कम स्विकारली व ते दोघे पोटे पोलीस यांचेकडील दुचाकीने लगबगीने पाथर्डी पोलीस स्टेशनला आले त्यांनी पोलीस स्टेशनला येतांना सदर लाचेची रक्कम रस्त्यातील चहा टपरीजवळ पाथर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक, रामदास सोनवणे यांचेकडे देण्यास सांगुन ती लंपास केली. सदर कारवाई बाबत सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आला आहे. तरी लक्ष्मण सुकदेव पोटे, वय वर्शे 35, पोलीस शिपाई 538, पाथर्डी पोलीस स्टेशन, जिल्हा अहिल्यानगर यांनी, माझे शिवनेरी मिसळ हॉटेलवर कारवाई न करण्यासाठी पंच साक्षीदार समक्ष दि. 15/06/2025 रोजी माझेकडे दर महीन्याला 1,500/- रू प्रमाणे हप्ता म्हणुन लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारण्याचे मान्य करून आज दिनांक 17/06/2025 रोजी दुपारी 12.30 वाजेच्या सुमारास सदर लाचेची रक्कम पंचासमक्ष पाथर्डी पोलीस स्टेशन कडील पोस्को कायदयाप्रमाणे दाखल गुन्हयातील वैदयकिय तपासणी साठी उप जिल्हा रूग्णालय पाथर्डी येथे आणलेल्या पोलीस कोठडीतील आरोपी नामे राहुल शिवाजी साबळे यास घेण्यास सांगुन राहुल साबळे यास ती रकम लाचेची असल्याचे माहीत असुनही त्याने सदर रक्कम स्विकारून नंतर ते पाथर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक, रामदास सोनवणे यांचेकडे देवून त्यांना लाचेच्या रक्कमेसह पळवून लावून पुरावा नश्ट केला.

अशा प्रकारे पाथर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस शिपाई लक्ष्मण सुकदेव पोटे यांनी तक्रारदार यांचेकडे लाच मागणी करून, स्वीकारून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले. तसेच इसम नामे राहुल साबळे यांने नमुद रक्कम लाचेची असल्याचे माहीत असतांना सदर रक्कम स्विकारली व सदर रक्कम पोकॉ/पोटे यांचे सांगणेवरून पोलीस नाईक/1780 रामदास जयराम सोनवणे यांचेकडे दिली. तसेच पोलीस नाईक/1780 रामदास जयराम सोनवणे यांनी पोलीस शिपाई लक्ष्मण पोटे यांचे सांगणेवरून त्यांचे ताब्यातील आरोपी राहुल साबळे याचेकडुन सदर लाचेची रक्कम घेवुन पळुन जावुन पुरावा नश्ट केला म्हणून माझी त्यांचेविरूध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहीली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टाईप केलेली आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

vilas sahadu pujari(I (Inspector)) / **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पाथर्डी पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): vilas sahadu pujari
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):